तक्ता अ

**- : जाहीर नोटीस :-**

अर्थ व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय,सोलापूर,

**जा.क्र. /१८७७ / 2024, दि. १३/०६/ 2025**

जिल्हा न्यायालय, सोलापूर मुख्य इमारत येथे प्रस्थापीत व्ही.सी. व पी.ए.रुम येथील सी.सी.टी.व्ही. प्रणालींचे तपासणी व दुरुस्ती करीता अधिकृत विक्रेते व सेवा पुरवठादार यांच्यामार्फत दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

## नियम व अटी

१. जिल्हा न्यायालय, सोलापूर मुख्य इमारत येथे प्रस्थापीत व्ही.सी. व पी.ए.रुम येथील सी.सी.टी.व्ही. प्रणालींचे तपासणी व दुरुस्ती करीता अधिकृत विक्रेते व सेवा पुरवठादार यांचेकडून दरपत्रक मागविणेकरीता ही जाहीर टेंडर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून (७) सात दिवसात म्हणजेच दि. **२०/०६/२०२५** रोजी सकाळी 10.30 पासून ते दुपारी 04.30 वाजेपर्यंत मोहोरबंद निवीदा मा. प्रबंधक कार्यालय, जिल्हा न्यायालय, सोलापूर येथे सादर करावे.

२. सदर बंद लखोट्यावर "***QUOTATION FOR CCTV REPAIRES*** " असे नमुद करण्यात यावे.

३. सदर प्रणाली तपासणी करीता कोणत्याही प्रकारची फी अदा केली जाणार नाही. निविदा सादर करणे व तसेच दुरुस्तीकरीता लागणारे साहित्य कार्यालयापर्यंत पोहचविणे इ. बाबी स्वखर्चाने करावे लागेल. सदर बाबतचा खर्च अनुज्ञेय होणार नाही.

४. दरपत्रकांमध्ये प्रणाली तपासणी अहवाल तसेच आवश्यक नादुरुस्त झालेल्या वस्तूंचे दर हे (मजुरी) सेवाखर्चासह सादर करावेत.

५. निविदाकारांनी निविदा / दरपत्रक सादर करतांना त्यावर GST /SGST क्रमांक असलेले तथापी, GST /SGST क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक नमुद असलेले निविदाकाराच्या लेटर हेडवरील दरपत्रक वैध असतील.

६. दरपत्रक भरतांना सर्व करांसह दरपत्रक भरावे. मात्र GST टॅक्स असल्यास त्याचा स्वतंत्र दर नमुद करावा. त्याचवेळी महाराष्ट्र शासनास पुरवठा केल्यास तरतुदीप्रमाणे सुट दिली जाते त्या अटीस आधीन राहून दरपत्रक द्यावे लागेल तसेच बिलाची रक्कम अदा करतांना नियमानुसार TDS कपात करण्यात येईल.

७. सदर तपासणी ही कार्यालयीन वेळेतच (सकाळी १०.३० ते सायं.५.००) सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयात उपस्थित राहूनच करावयाची आहे.

८. तपासणी करुन झालेल्या प्राप्त अहवाल आणि दरपत्रके मंजूर करण्याचा अगर कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार "मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, सोलापूर" यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

आदेशावरुन,

क.लि. सहा. अधिक्षक

DISTRICT COURT OF SHOLAPUR
सत्यमेव जयते
डिस्ट्रिक्ट कोर्ट सोलापूर

प्र. प्रबंधक
जिल्हा न्यायालय, सोलापूर